# नियम पुस्तिका - एक

**संस्थेची वैशिष्टये, कार्ये आणि कर्तव्ये**

कर्मचाऱ्यांची एकूण संख्या:

प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) खात्याच्या अखत्यारित एकूण 235 कर्मचारी आहेत, त्यापैकी फक्त 130 पदे भरण्यात आलेली आहेत. यात अभियांत्रिकी, प्रशासकीय (लिपिक, अनुरेखक आणि आरेखक) यांचा समावेश आहे.

प्रत्येक मलनि:सारण परिमंडळामध्ये असलेल्या उदंचनकेंद्राकडे जाणा-या मलवाहिन्यांचे नियोजन, संकल्पचित्रे आणि मलनि:सारण वाहिन्या टाकण्याचे काम या करीता दोन उप प्रमुख अभियंता असून त्यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली सदर काम केले जाते.

उप प्रमुख अभियंता (म.प्रकल्प) नि. व सं. चित्रे या अभियंत्याकडे प्रत्येक मलनि:सारण परिमंडळामध्ये मलवाहक यंत्रणेचे संकल्पचित्रे तयार करणे हे काम सोपविलेले आहे. मुंबई शहरामध्ये विविध ठिकाणी चरविरहित प्रगत तंत्रज्ञानाने मलनि:सारण वाहिन्या टाकण्याचे काम जागतिक बँकेच्या आर्थिक सहाय्याने देशात प्रथमच सुक्ष्मबोगदा विभागातर्फे हाती घेण्यात आले आहे. लोहमार्ग, द्रुतगती मार्ग अशा ठिकाणी जेथे पारंपारिक पध्दतीने मलनि:सारण वाहिन्या टाकता येणे शक्य नाही अशा अवघड परिस्थितीत सदर तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात येतो. जेथे विविध व्यासाच्या वाहिन्या टाकण्याचे काम पार पाडावयाचे असते तेथे अन्य चरविरहित पध्दत म्हणजेच हॉरिझोन्टल डायरेक्शनल ड्रीलिंग तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात येतो.

उप प्रमुख अभियंता (म.प्रकल्प) बांधकामे या अभियंत्याकडे मलनि:सारण वाहिन्यांचे जाळे तयार करण्याचे काम सोपविले आहे.